# पुणे महानगरपालिका
# स्थायी समिती
# कार्यपत्रिका क्र. ०३
# सभा क्र.०३, दिनांक १७/०४/२०२५ चा वृत्तांत

पुणे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिकसभा गुरूवार, दि. १७/०४/२०२५ रोजी दुपारी ४.०० (चार) वाजता मा. महापालिका आयुक्त कार्यालय, पुणे महानगरपालिका भवन, पुणे येथे संपन्न झाली.

सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| मा. डॉ राजेंद्र ब भोसले | – | प्रशासक तथा महापालिका आयुक्त, पुणे मनपा |
| मा. सौ. योगिता भोसले–निकम | – | नगरसचिव |
| मा. कोळंबे, | – | मुख्य लेखा परीक्षक |
| मा. संदीप कदम | – | उपायुक्त (घनकचर व व्यवस्थापन) |
| मा. उल्का कळसकर | – | मुख्य लेखा व वित्त अधिकारी |
| मा. नितीन केंजळे | – | मुख्य कामगार अधिकारी |
| मा. नंदकिशोर जगताप | – | मुख्य अभि.(पापु.) |
| मा. सौ. प्रतिभा पाटील | – | उपायुक्त, (सा.प्र. व भूसंपादन) |
| मा. श्रीमती मनिषा शेकटकर | – | मुख्य अभि.(विद्युत) |
| मा. श्रीमती आशा राऊत | – | शिक्षणाधिकारी |

मा. प्रशासक – सभेला सुरूवात करावी.
नगरसचिव – सभेला सुरूवात करण्यात येत आहे, प्रथम दाखल विषय घेऊ.

## दाखल विषय

**विषय क्र.४०त्वर्य**

उप आयुक्त, परिमंडळ क्र.३ कार्यालयाचे नियंत्रणाखालील सिंहगड रोड, धनकवडी-सहकारनगर व वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालयांकडील १४ मुद्द्यांबाबतची माहे मार्च २०२५ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. उप आयुक्त, परिमंडळ क्र.३ यांचे जा.क्र.उआप-३/२५२, दि.१५/०४/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक– दाखल नोंद करा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून नोंद घेण्यात आली.**

**विषय क्र.४१त्वर्य**

औंध बाणेर क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत नव्याने समाविष्ट २३ गावांपैकी सुस व म्हाळुंगे गावातील नाल्याची साफसफाई करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. Ramesh Annasaheb Deshmukh यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.४९,९९,३१२/- पेक्षा ४५.९९९% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२६,९९,६७८=४७ अधिक जीएसटी र.रु.०/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.२६,९९,६७८=४७ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनि/३५, दि.१५/०४/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक– दाखल मान्य करा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.४२त्वर्य**

दिनांक १७/०३/२०२५ ते दिनांक २३/०३/२०२५ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत लागलेल्या एकूण १२८ आगींबाबत मा. अति.महा.आयुक्त(ज) यांनी जा.क्र.मआ/अग्निशमन/३६, दि.१६/०४/२०२५ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

मा. प्रशासक– दाखल नोंद करा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून नोंद घेण्यात आली.**

**विषय क्र.४३त्वर्य**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र.२, यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.०१/०२/२०२५ ते २८/०२/२०२५ अखेरची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(ड) नुसार मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणे बाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र मआ/परि.क्र.२/३७, दि.१६/०४/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक– दाखल नोंद करा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून नोंद घेण्यात आली.**

**विषय क्र.४४त्वर्य**

उप आयुक्त, परिमंडळ क्र.२ कार्यालयाचे नियंत्रणाखालील औंध-बाणेर, शिवाजीनगर-घोले रोड व कोथरूड-बावधन क्षेत्रीय कार्यालयांकडील १४ मुद्द्यांबाबतची माहे मार्च २०२५ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/परि.क्र.२/३८, दि.१६/०४/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक– दाखल नोंद करा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून नोंद घेण्यात आली.**

**विषय क्र.४५त्वर्य**

पुणे पेठ आंबेगाव खु.स.नं.८ (पै.).९ (पै) येथील पोस्ट ऑफिस आरक्षित जागा प्रवर अधिक्षक डाकघर, पुणे पश्चिम विभाग यांना पोस्ट ऑफिस कार्यालयास ५ वर्षे कालावधीसाठी भाडेतत्वावर देणेबाबत व त्यांचेशी करारनामा करणेस खालील बाबींस मान्यता मिळणे बाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मालमत्ता/२०४४; दि.२४/०३/२०२५ चे पत्रावर झालेला मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र.१, दि.११/०४/२०२५ विचारासाठी.

१. पुणे पेठ आंबेगाव खु. स.नं. ८ (पै.)+ ९(पै.) येथील लेक व्हिस्टा सोसायटी, ग्राउंड फ्लोअर, "0" बिल्डींग येथील तळ मजल्यावरील एकूण क्षेत्रफळ १००.४९ चौ.मी. पोस्ट ऑफीस आरक्षित गाळा मासिक भाडे रक्कम रु.२८,७४२/- अधिक शासकीय कर (दर ३ वर्षानी भाडेपट्ट्याच्या रकमेत सुधारणा करून वर्तमान भाडेपट्ट्याची रक्कम पाच टक्क्यांनी वाढ) अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका (स्थावर मालमत्तेचे भाडेपट्ट्याचे नुतनिकरण) नियम २०२३ मधील नियम क्र.३ (III) (ब) मधील अटी शर्तीनुसार ५ वर्षे कालावधीसाठी ताबा दिनांकापासून पोस्ट ऑफीस वापराकरिता प्रवर अधिक्षक डाकघर, पुणे पश्चिम विभाग यांना भाडेतत्वावर देणेस.
२. प्रवर अधिक्षक डाकघर, पुणे पश्चिम विभाग यांचे समवेत नोंदणीकृत करारनामा करणेस.

मा. प्रशासक– दाखल मान्य करा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.४६त्वर्य**

पुणे पेठ शिवाजीनगर येथील स्वा. सावरकर भवन मनपा इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील गाळा क्र. ओ.१ ए मधील ५५० चौ फुट क्षेत्र ५ वर्षे कालावधीकरिता देणेसाठी व खालील बाबींस मान्यता मिळणे बाबत मा.महा. आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मालमत्ता/२०४६, दि.२४/०३/२०२५ चे पत्रावर झालेला मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र.२, दि.११/०४/२०२५ विचारासाठी.

१) पुणे पेठ शिवाजीनगर येथील स्वा. सावरकर भवन मनपा इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील गाळा क्र. ओ-१ ए मधील ५५० चौ फुट क्षेत्र ५ वर्षे कालावधीसाठी (दर तीन वर्षांनी 'भाडेपट्ट्याच्या रकमेत सुधारणा करून वर्तमान भाडेपट्ट्याच्या रकमेत ५ टक्क्यांनी वाढ करून आणि (iii) (अ) नुसार त्या प्रमाणात सुरक्षा अनामत रकमेत देखील वाढ करून) दि महाराष्ट्र मंत्रालय ॲण्ड अलाईड ऑफिसेस को-ऑपरेटीव्ह बँक लि. यांना मासिक भाडे र.रु.५३,३६३/- (अधिक वस्तू व सेवा कर) या प्रमाणे ताबा दिनांकापासून ५ वर्ष कालावधीसाठी भाडेपट्ट्याने देणेस.
२) दि महाराष्ट्र मंत्रालय ॲण्ड अलाईड ऑफिसेस को-ऑपरेटीव्ह बँक लि. यांचेकडून नियमानुसार शासकीय कर भरून घेणेस व नोंदणीकृत करारनामा करणेस,
३) दि महाराष्ट्र मंत्रालय ॲण्ड अलाईड ऑफिसेस को-ऑपरेटीव्ह बँक लि. यांचेकडून मासिक भाडे र.रु.५३,३६३/- (अधिक वस्तू व सेवा कर) या प्रमाणे तीन महिन्याचे भाडे इतकी सुरक्षा अनामत र.रु.१,६०,०८९/- भरून घेणेस.

मा. प्रशासक– दाखल मान्य करा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.४७त्वर्य**

पुणे महानगरपालिकेच्या येरवडा हॉट मिक्स प्लांटकरिता डांबरी (व्ही. जी. ३०/४० बेड), एल. डी. ओ. इमल्शन आर.एस.-I, आर.एस.II महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) अन्वये र रु १२ कोटी इतक्या रकमेची डांबर खरेदी करणेबाबत व खालील बाबींस मा स्थायी समिती मार्फत मा मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करणे बाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/३९, दि.१६/०४/२०२५ चे पत्र.

१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 67 (3) क अन्वये डांबर, एल.डी.ओ. हि दोन्ही मटेरियल्स मे. हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पो.ली. आणि मे. भारत पेट्रोलियम कॉर्पो. ली. यांचे कडून एप्रिल ते जून २०२५ आवश्यकतेनुसार मुंबई येथील रिफायनरी मधून खरेदी पुढील निविदा मान्यते पर्यन्त करणेस व सदरचा डांबरी माल रिफायनरी ते येरवडा हॉट मिक्स प्लांट पर्यन्त पुणे महानगर पालिकेच्या मोटर वाहन विभागाच्या निविदेमधून वाहतूक करणेस.
२) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 67 (3) क अन्वये Emulsion RS-I व Emulsion RS-II, हे मटेरियल्स में हिंदुस्थान कोलास कंपनी या कंपण्याकडून एप्रिल ते जून २०२५ आवश्यकतेनुसार पुढील निविदा मान्यते पर्यन्त खरेदी करणेस. व सदरचा डांबरी माल रिफायनरी ते येरवडा हॉट मिक्स प्लांट पर्यन्त पुणे महानगर पालिकेच्या मोटर वाहन विभागाच्या निविदेमधून वाहतूक करणेस.

३) वरील मटेरियल्स खरेदी पोटी मे. हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पो. ली. मे. भारत पेट्रोलियम कॉर्पो.ली व मे हिंदुस्थान कोलास प्रा.ली. या तिन्ही कंपन्यांना वेळोवेळी आवश्यकतेनुसार अग्रिम (advance) रक्कम (रुपये १२ कोटी पर्यन्त) चेक आर. टी. जी एस स्वरुपात, सन 2025-26 अंदाजपत्रकातील बजेट कोड क्र. SE15A106 (विशेष कार्याधिकारी पथ) या अर्थशीर्षकामधून अदा करणेस.

मा. प्रशासक– दाखल मान्य करा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

<u>**कार्यपत्रिकेवरील विषय**</u>

<u>**उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा**</u>

**विषय क्र.३९**

उप आयुक्त, परिमंडळ क्र.४ कार्यालयाचे नियंत्रणाखालील हडपसर-मुंढवा, वानवडी-रामटेकडी व व कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालयांकडील १४ मुद्द्यांबाबतची <u>माहे फेब्रुवारी २०२५</u> चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. उप आयुक्त, परिमंडळ क्र.४ यांचे जा.क्र.उआप-४/१८४, दि.०८/०४/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक– नोंद घ्या.

**निर्णय – सदरा विषयाची नोंद घेतली.**

वरीलप्रमाणे कामकाज होऊन सभा समाप्त झाली.

**सही /–** xxx
**(योगिता भोसले)**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका**.

**दि. ३०/०४/२०२५ रोजी वृत्तांत मंजूर.**

**सही /–** xxx
**(डॉ राजेन्द्र ब भोसले)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**पुणे महानगरपालिका.**